## - पूर्वजन्म आणि पुनर्जन्म -

भारतीय तत्त्वज्ञानाला हजारो वर्षांची दिव्य परंपरा लाभली आहे. जिज्ञासु वृत्तीने आपल्या ऋषींनी निसर्गाचे, सूर्य, तारे, ग्रह नक्षत्रांचे बारकाईने निरीक्षण केले. त्यातून त्यांना या सृष्टिचक्राचे ज्ञान झाले. सखोल चिंतनातून त्यांना तरल अवस्था प्राप्त झाली. त्यातून अनेक अज्ञात, अव्यक्त घटनांच्या मागील रहस्य त्यांनी जाणून घेतले. अवती भवती घडणाऱ्या नैसर्गिक घटनांमधून ऋतुबदलाचे शास्त्र त्यांना अवगत झाले. निसर्गामध्ये एखाद्या बीजाला अनुकूल पोषक वातावरण मिळाले तर त्यातून अंकुर कसा येतो. त्या अंकुराचेच हळूहळू रोप होते, त्या रोपाचा वृक्ष होतो आणि कालांतराने जुने वृक्ष वठून जातात, पडतात, त्यांचा नाश होतो. परंतु त्याच वेळी दुसरीकडे लहानसा कोंब लवलवत बीजातून बाहेर येऊ पहात असतो. म्हणजे उत्पत्ति-स्थिती-लय हे कालचक्र अविरत सुरूच आहे. निसर्गातील प्रत्येक निर्मितीला हा नियम लागू असेल तर मनुष्यजीवनही असेच असले पाहिजे.

एखाद्या जीवाचा अंत होत असतो तेव्हा दुसरीकडे सृजनाचा सोहळा सुरु असतो. जन्म मृत्युच्या दोन टोकामध्ये असते तेवढे आयुष्य असे कळून चुकते. मग या मानव जन्माची सार्थकता तरी कशात आहे? मृत्युनंतर नवा देह कोणता मिळतो? ८४ लक्ष योनिंमधून हा देह फिरत असतो म्हणूनच दुःखे भोगत असतो. त्या दुःखापासून मुक्तता मिळवणे म्हणजेच मोक्ष!

पण मुळात प्रश्न हा आहे की असा जीव विविध योनिंमधून फिरतो, तो का? पुढचा जन्म कोणता मिळावा हे कशावर ठरते? माणसाला पुन्हा माणसाचाच जन्म मिळतो का? आणि मिळाला तरीसुद्धा एवढ्या अब्जावधि जीवांमध्ये काही भाग्यवंतांना उत्तम कुळात जन्म लाभतो तर काही दुर्दैवी जीव हीन कुळात जन्म घेऊन घाणीत, अज्ञानात खितपत पडतात यामागे कोणती कारणपरंपरा आहे? काहींना बालपणीच सर्वज्ञता लाभते यामागे त्यांची काय पूर्वपुण्याई असते? या सर्वांची उत्तरे ऋषींना

सखोल चिंतनातून मिळाली. ती त्यांनी लिखित स्वरूपात काही तत्त्वज्ञानविषयक ग्रंथातून मांडली आहेत.

श्रीमद्‌भगवद्‌गीतेत तर कर्माचा अटळ सिद्धांत अत्यंत तर्कशुद्ध पद्धतीने मांडला आहे. जसे कर्म तसे फळ! जिथे कर्म आहे तिथे फळ मिळणारच. तुमची इच्छा असो किंवा नसो! कोणतेही कर्म फळ दिल्याशिवाय शांत होत नाही. सत्कर्माचे फलस्वरूप पुण्य तर दुष्कर्मामुळे पापाची प्राप्ति होते. काही कर्माचे फळ अगदी लगेच मिळते. तर काही कर्मांची फळे मिळण्यासाठी बराच काळ जावा लागतो. पाणी प्यायल्यावर लगेच तहान भागते मात्र परीक्षा दिल्यानंतर निकालासाठी थोडी वाट पहावी लागते. म्हणजे फळ निश्चित असले तरी काळ अनिश्चित असतो. काही वेळा तर कर्माचे फळ मिळण्यासाठी इतका मोठा कालावधि जावा लागतो की या जन्मीच्या कर्माची फळे पुढच्या जन्मी मिळतात. त्यालाच संचित कर्म म्हणतात. संचित म्हणजे साठलेले! जे कर्म फळ देण्यासाठी पक्व झालेले असते त्याला प्रारब्ध तर नित्य घडणाऱ्या कर्माला क्रियमाण कर्म असे म्हणतात. जसे पेरावे तसे उगवते. संचित कर्मानुसार पुढचा जन्म ठरत असतो. समर्थ मनोबोधात म्हणतात.

मना त्वांचि रे पूर्वसंचित केले।
तयासारिखे भोगणे प्राप्त झाले॥

खरोखर हे संचितकर्म पुढच्या जन्मी उपयोगी पडते का? का मागील जन्मात केलेली सगळी साधना वाया जाते? असा प्रश्न अर्जुनालाही पडला होता. अशा संभ्रमित अवस्थेतील अर्जुनाला भगवंत उत्तर देऊन आश्वस्त करतात. तेव्हा ते उत्तर सर्वसाधारण रहात नाही. एक मौलिक सिद्धांत त्या उत्तरातून मांडला आहे. त्यामुळे अर्जुनाप्रमाणे अगदी सामान्य साधकालाही मिळतो. इथे ते आपल्याला एक अभिवचन देतात की तुझी साधना काही वाया जाणार नाही. अरे, शुभकर्म करणारा कोणीही दुर्गतिला जात नाही

अशा या सांगण्याने मनातील संशय दूर होतात. या जन्मात केलेली सत्कृत्ये अपूर्ण राहिली तरी ती निश्चितपणे वाया जाणार नाहीत. पुढच्या जन्मी त्याचा उपयोग होणार आहे. किंबहुना पूर्वजन्मातील कर्मावरूनच पुढचा जन्म ठरणार आहे. ती कर्मे carry forward होणार आहेत. याची खात्री पटली की निराशा दूर होते. सत्कर्माला जोर येतो.

प्रवास करत असताना एखादा वाटसरू थकून झाडाखाली झोपला तर जागा झाल्यावर त्याला पुन्हा पहिल्यापासून प्रवास करावा लागत नाही. ज्या झाडाखाली तो निजला होता तिथपासून त्याचा प्रवास सुरू होतो. किंवा पुस्तक वाचत असताना समजा डोळा लागला तर उठल्यावर पुन्हा पहिल्यापासून पुस्तक वाचावे लागत नाही. तसेच शुभकर्मे करत असताना मृत्यु आला तरी त्यापुढच्या जन्मात शून्यापासून सुरुवात करावी लागत नाही. मागील जन्मातील कर्मे त्याच्या पुण्यसंचयात जमा झालेली असतात. त्यामुळे पुढील जन्मी नव्या जोमाने, अधिक उत्साहाने साधक सिद्धीसाठी प्रयत्न करतो. शुभकर्मे करणाऱ्या जीवाला नवीन जन्म पवित्र आणि श्रीमंत कुळात मिळतो. त्याच्या उपासनेला कुळपरंपरेचे पाठबळ लाभते. ज्याची ध्यानाची तपश्चर्या अपुरी राहिली आहे आणि ज्याने काही योगाचे संचित कमावले आहे त्याला गीतेने योगभ्रष्ट म्हटले आहे. भ्रष्ट हा शब्द इथे चांगल्या अर्थाने म्हणजेच अपूर्ण योगसाधनेचा साधक अशा अर्थाने वापरला आहे.

भगवंताच्या या सिद्धांताला पुष्टि देणारी अनेक उदाहरणे आपल्याला इतिहासात पहायला मिळतात. खरे बाहिले तर स्वामी विवेकानंद, लो. टिळक हे सर्व महात्मे योगभ्रष्टच म्हणावे लागतील. त्यांचे पूर्वजन्मीचे संस्कार पराकोटीचे शुभ होते, त्याशिवाय इतक्या कमी अवधित इतके लोकोत्तर कार्य घडणे शक्यच नाही. त्याच्या ही मागे जाऊन ही ऋषीपरंपरा पाहिली तर राजा जनक, शुकाचार्य, आद्य शंकराचार्य यांना इतक्या अल्प वयात

आत्मज्ञानाची प्राप्ति कशी झाली, हे आश्चर्यच म्हणावे लागेल. परंतु त्यामागे हा कर्माचा सिद्धांतच आहे. मात्र यामागे ईश्वरीय कर्मानुसार विविधता आढळते.

1. गृहस्थाश्रमी व ज्ञानी माणसाच्या घरी जन्म घेणारे रामकृष्ण परमहंस
2. श्रीमंत पण सदाचारसंपन्न घराण्यात जन्म घेणारे योगी अरविंद
3. ज्ञानी परंतु दरिद्री कुटुंबात जन्म मिळालेले लोकमान्य टिळक
4. राजघराण्यात जन्म लाभलेले छ. शिवाजी महाराज
5. ब्रम्हनिष्ठ महात्म्यांच्या पोटी जन्म झालेले

मागील जन्मात लाभलेली चांगली बुध्दी या जन्मी उपयोगी येते. असा हा योगमार्गात प्रवृत्त झालेला संन्यासी योगभ्रष्ट होऊनही कर्मनिष्ठ व्यक्तीपेक्षा श्रेष्ठच असतो. पूर्वजन्मीच्या अभ्यासामुळे त्याला आतून प्रेरणा मिळते व तो भगवंताकडे खेचला जातो. योगाचा अभ्यास हा अनेक जन्म चालणारा असला तरी अखेर त्याच्या प्रयत्नाने त्याला परमगती प्राप्त होते. सर्वश्रेष्ठ पदापर्यंत तो पोहोचतो. अर्थातच ज्या मुक्कामाला पोहोचल्यावर जन्ममृत्युची येरझार थांबते म्हणजेच या चक्र्या फेऱ्यातून तो सुटतो, म्हणजेच मुक्त होतो.

काही मोजक्या महात्म्यांना पूर्वजन्माचे स्मरण असते. तुकाराम महाराजांच्या शिष्या संत बहिणाईंना तर त्यांचे मागील १२ जन्म आठवत होते, असे म्हणतात. परंतु यावरुन हे स्पष्ट होते की माणसाला पूर्वजन्मही आहे आणि पुनर्जन्मही आहे. परंतु सामान्य माणसाला मात्र मागचे आठवत नाही आणि पुढच्या जन्माची कल्पना नाही. आपला प्रवास हा असा अव्यक्ताकडून अव्यक्ताकडे सुरु आहे.

अव्यक्तादीनि भूतानि व्यक्तमध्यानि भारत॥ गीता॥ ॥२.२८॥

परंतु या संसारचक्राची साखळी ज्यांना तोडता येते ते मुक्त होतात. याच नरदेहाचा उचित उपयोग करून घेतात. त्यांचे प्रत्येक कर्म हे यज्ञकर्मच असते. खरोखर निःस्वार्थीपणे जनकल्याणासाठी आपले जीवन वेचणे म्हणजे कर्मबंधनातून मुक्तता मिळणे आहे.

आपल्या कर्माच्या गुणवत्तेवरच नवीन जन्म कोणता मिळणार हे ठरत असते. तो अधिकाधिक उच्च दर्जाचा मिळावा, परमार्थमार्गाची ओढ आयुष्याच्या सुरुवातीलाच लागावी यासाठी कर्मे कशी परिणामकारक ठरतात यावर आद्य शंकराचार्यांनी 'विवेकचूडामणि' या ग्रंथात एक सुंदर व समर्पक रूपक केले आहे, ते आहे संसारवृक्षाचे!

मुंडकोपनिषदातील एक झाड व दोन पक्षी, या सर्वपरिचित उपमेशी हे रूपक साम्य साधते. या वृक्षाचे बीज आहे अज्ञान! देह हाच आत्मा मानणारी देहबुद्धि हा या बीजातून निघालेला अंकुर आहे. त्यातून निर्माण होणारी आसक्ती म्हणजे त्या वृक्षाला फुटलेली पालवी आहे. पुन्हा या आसक्तीच्या पालवीला, ममत्वाला कर्माचे पाणी घालघालून पुष्ट केले जाते. शरीर हा या वृक्षाचा बुंधा, प्राण याच्या फांद्या, तर इंद्रियसमूह हे याचे शेंडे आहेत. विविधरंगी फुले म्हणजेच विषय आहेत. आणि कर्मामुळे निर्माण होणारे दुःख हे या वृक्षाचे फळ आहे. या फळात पुन्हा अज्ञानाचे बीज असतेच. आणि हे सगळे भोगणारा जीव म्हणजे काही काळापुरता वास्तव्याला येणारा पक्षी आहे. असे हे सर्वांगसुंदर रूपक आहे. अज्ञानामुळे जीव पुन्हा पुन्हा जन्माला येतो. असे हे संसारचक्र सतत फिरत असते.

वस्तुतः सर्वत्र एकमेव ब्रह्मच आहे. त्यावर संसाराचा भास होत असतो. म्हणजेच अज्ञानाला या संसारवृक्षाचे बीज म्हटले आहे ते अगदी योग्यच आहे. वृक्ष जसा पाण्यावर वाढतो तसे या संसारवृक्षाला कर्माचे पाणी घालणे सतत सुरू आहे. त्यामुळे तो फोफावतो. कर्माच्या योगाने तो अधिकाधिक दृढमूळ होत जातो.

परंतु कर्माचा क्षय झाला तर संसारवृक्ष वाळून जाईल. म्हणजे त्याचे जीवनत्व नष्ट होईल. परंतु गीतेत म्हटल्याप्रमाणे कुणीही कर्म केल्याशिवाय क्षणभरही राहू शकत नाही. ज्याप्रमाणे पाणी घातल्यामुळे झाडाला फळे-फुले येतात तसेच कर्मे केल्यामुळेच दुःखरूपी फळे चाखावी लागतात. या फळांचा आस्वाद घेणारा भोक्ता जीव म्हणजे या झाडावरचा पक्षी! हा जीव विषयांच्या आकर्षक रंगीबेरंगी फुलांकडे आकर्षित होत असतो.

थोडक्यात हे संसारवृक्षाचे रूपक अत्यंत परिणामकारक आहे. अज्ञानामुळेच जन्म घ्यावा लागतो. परंतु एकदा का ज्ञानप्राप्ति झाली की मग अज्ञानाचा मागमूस देखील राहत नाही आणि बीजच उरले नाही तर मग नवा जन्मही शक्य नाही. आणि हीच खरी मुक्ती आहे.

सर्वच संतांनी या जन्ममरणाच्या फेऱ्यातून मुक्ती मिळण्याची इच्छा केली आहे. त्यासाठी वासनेचे बीज जळून जावे अशी प्रार्थना भगवंताकडे केली आहे.

आद्य शंकराचार्य तर आपल्या चर्पटपंजरिका मध्ये म्हणतात— पुनरपि जननं पुनरपि मरणम्
पुनरपि जननी जठरे शयनम्।
इह संसारे बहु दुस्तारे
कृपया पारे पाहि मुरारे॥

पुन्हा पुन्हा गर्भवासात रहायला लागणे व पुन्हा जन्माला येऊन दुःख भोगणे या चक्रात किती वेळा सापडणार? कधीतरी यातून सुटका व्हावीच. या दुस्तर भवसागरातून पलीकडे तर नक्कीच जायचे आहे. पण नेणार कोण? अर्धवट पोहायला शिकलेला मनुष्य कसेतरी हातपाय मारेल. पण तरीही गटांगळ्या खाईल. त्याला त्यातून बाहेर काढणारा कोणीतरी खंबीर हवा. तो वाचवणारा केवळ मुरारि आहे. म्हणून त्याचा धावा करायचा.

'मी परब्रह्माचा अंश आहे' याची जाणीव जीवाला गर्भात असेपर्यंत निश्चित असते. तिथे असताना तो

'सोऽहम्' असे म्हणत असतो. मात्र जन्माला येताच ही आठवण पुसून जाते व तो म्हणू लागतो - कोऽहम्।

आणि मग सुरु होतो तो आत्मशोध। त्यासाठी तो अनेक प्रकारे साधना, उपासना, योगमार्ग यांचा अवलंब करतो. परंतु कितीही शोध घेतला तरी अंतिम गंतव्य काही सापडत नाही; 'मी' चा शोध लागत नाही. जिथून आलो तिथे पोहोचलो तरच खरी विश्रांति लाभते. आणि त्या परमात्म्याशी एकरूप होण्यासाठी जी क्षमता व पात्रता आवश्यक आहे, ती केवळ आणि केवळ माणसाकडेच आहे. इतर सर्व योनि या भोगयोनि आहेत. क्रियमाणाचे स्वातंत्र्य केवळ मानवालाच आहे. या कर्मस्वातंत्र्याच्या माध्यमातून स्वतःचा उद्धार करून घ्यायला हवा.

पण मनुष्य हे सारे विसरून जातो. विषयसुखात, प्रपंचात रममाण होतो. आसक्त होतो, आणि मानवी जीवनाच्या मूळ उद्देश विसरून जातो. त्यामुळे त्याला पुन्हा पुन्हा जन्म घ्यावा लागतो. हे म्हणजे एकाच वर्गात परत परत नापास होण्यासारखे आहे. उद्धाराची संधि समोर असताना ती करंटेपणाने गमावणे व त्यामुळे पुन्हा जन्म घ्यावा लागणे ही दुर्दैवाची परिसीमा आहे. आपल्या भारतीय तत्त्वज्ञानात पुनर्जन्माच्या कल्पनेला मान्यता आहे. परंतु तो उत्तरोत्तर प्रगतिसाठी हवा. गीता-

बहूनां जन्मनामन्ते ज्ञानवान्मां प्रपद्यते।
वासुदेवः सर्वमिति स महात्मा स सुदुर्लभः॥

म्हणजेच अनेक जन्म घ्यावे लागले तरी अंतिम जन्मात भगवत्प्राप्ति व्हायला हवी. किंवा वेगळ्या शब्दात मांडायचे झाले तर भगवंत भेटतो तोच जन्म शेवटचा। परंतु तो लवकरात लवकर व्हायला हवे असेल तर हे संसारातील भरकटणे थांबायला हवे. एकच निश्चित ध्येय डोळ्यांसमोर असेल तर कदाचित आत्मज्ञानासाठी ते साहाय्यभूत ठरेल. आणि मग प्रत्यक्ष भगवंताची प्राप्ति होईल. जिथे ज्ञाता-ज्ञेय-ज्ञान ही त्रिपुटी गळून पडेल

तिथे पोहोचल्यावर दुःखाचा, अज्ञानाचा, पापाचा लवलेशही शिल्लक राहणार नाही. तिथे केवळ ज्ञानाचा लख्ख प्रकाश असेल. द्वैत उरणारच नाही. असेल ते केवळ अद्वैत आणि फक्त आनंद!

आनंदाचे डोही आनंद तरंग। अशी अवस्था प्राप्त होणे आणि त्या अवस्थेचेही भान न उरणे ही खरी 'ब्राह्मी स्थिती'। ती प्राप्त झाली की तिथून परत फिरणे नाही. आणि मग पुन्हा जन्मही नाही, अर्थात्च मृत्युही नाही. यद् गत्वा न निवर्तन्ते तद् धाम परमं मम।

अशा परमधामापर्यंत पोहोचणे हीच खरी मानवी जीवनाची सार्थकता!

फोन- 020-25386964
9373366611

माधवी रघुवीर जोशी
डी-१०, बुडलँड्स
गांधी भवन जवळ
कोथरूड, पुणे
४११०३८